**प्रवर्तक मे.व्हेरिटास पॉलिकेम प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांच्या प्रस्तावित एकात्मिक (पीव्हीसी प्रकल्प, पीएमबी प्रकल्प, गॅस साठवण टर्मिनल, एलपीजी बॉटलिंग प्रकल्प, गॅसवर आधारित उर्जा व समुद्राचे पाणी निक्षारिकरण (डिसलिनेशन, आर.ओ.प्रक्रिया) प्रक्रिया या दिघी बंदर क्षेत्र, मौजे नानवली, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड येथील प्रकल्पाच्या घेण्यात आलेल्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त**

---

भारत सरकार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाकडील अधिसुचना दि.१४/०९/२००६ व सुधारित अधिसुचना दि.०१/१२/२००९ अनुसार व भारत सरकार, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाकडील दि.१४/०९/२०२० रोजीचे तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील पत्र क्र.बी-२००९१७-एफटीएस-००८२, दि.१७/०९/२०२० अन्वये दिलेले निर्देशानुसार कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रत्यक्ष जन-सुनावणी बरोबरच ऑनलाईन जनसुनावणी घेण्याचे आदेश देण्यात आलेले होते. त्यानुषंगाने जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालयकडील पत्र क्र.गृह-एमएजी-१/जनसुनावणी/२०२० दि.२५/०९/ २०२० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार संबंधित प्रकल्प प्रवर्तक मे. व्हेरिटास पॉलिकेम प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांच्या प्रस्तावित एकात्मिक (पीव्हीसी प्रकल्प, पीएमबी प्रकल्प, गॅस साठवण टर्मिनल, एलपीजी बॉटलिंग प्रकल्प, गॅसवर आधारित उर्जा व समुद्राचे पाणी निक्षारिकरण (डिसलिनेशन), (आर.ओ. प्रक्रिया) प्रक्रिया या दिघी बंदर क्षेत्र, मौजे नानवली, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड येथील प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी **दि.२९/०९/ २०२० रोजी दुपारी १२.०० वा. गट नं.१८, करलास गावाजवळ, दिघ - श्रीवर्धन रस्ता, करलास, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (४०२ ४०२)** येथे घेण्यात आली.

उपरोक्त नमूद शासन निर्देशानुसार सदर पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी घेण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

१. जिल्हादंडाधिकारी, रायगड किंवा त्यांचे प्रतिनिधी - **अध्यक्ष**
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा)

२. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ रायगड - **सदस्य**

३. उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड - **समन्वयक**

मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी रायगड यांनी पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी कामी त्यांचेवतीने श्रीम.पदमश्री बैनाडे, अपर जिल्हादंडाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे.

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स व्हेरिटास पॉलिकेम प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई यांच्या पॉली विनाइल क्लोराईड (पीव्हीसी) प्लांट, पॉलिमर मॉडिफाइड बिटुमेन (पीएमबी) प्लांट, गॅस स्टोरेज टर्मिनल,एलपीजी बॉटलिंग प्लांट, गॅस बेस्ड कॅप्टिव्ह पॉवर प्लांट, सी वॉटर डिसेलिनेशन प्लांट यांचा समावेश असलेल्या एकात्मिक प्रकल्प मौजे नानावली, ता.श्रीवर्धन, येथील गट क्र.४९,५०,५१,५२,५३,५४,५६,५७,६१, ६३,६६,७५/अ (दिघी बंदर) या ठिकाणी प्रस्तावित प्रकल्पासाठी पर्यावरण अनुमती मिळविण्या साठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

प्रकल्प प्रवर्तकांना दि.१३/०९/२०१९ रोजी काही अटी व शर्ती निर्देश करुन पर्यावरण आघात रुपरेषा करण्यास (टीओआर- टर्म्स ऑफ रेफरन्स) प्राथमिक मान्यता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून प्रदान करण्यात आलेली आहे.

भारत सरकारच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसुचनेनुसार जनसुनावणी बैठकीच्या तीस दिवस अगोदर जास्त प्रमाणात प्रसारित होणा-या स्थानिक वृत्तपत्र ' दैनिक सागर' यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र 'इंडियन एक्सप्रेस' यात इंग्रजीत दि.२५/०८/२०२० रोजी पर्यावरणविषयक जनसुनावणीची जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. तसेच पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीबाबतचे शुध्दीपत्र स्थानिक दैनिक वृत्तपत्र 'सागर' यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र 'इंडियन एक्सप्रेस' यात इंग्रजीत दिनांक २४/०९/२०२० रोजी प्रकाशित करण्यात आले. त्यात सदरहू प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय हरकती, सूचना वा आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल मराठी व इंग्रजी शासनाच्या विविध सूचित (Notified) केलेल्या खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला होता.

- जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड-अलिबाग.
- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड - अलिबाग
- महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड - अलिबाग
- तहसिलदार कार्यालय श्रीवर्धन ता.श्रीवर्धन, जि.रायगड.
- गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीवर्धन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड.
- प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय म.प्र.नि. मंडळ, रायगड.
- सह.संचालक (जल प्रदूषण नियंत्रण),म.प्र.नि. मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा मजला, सायन माटूंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कल समोर, सायन (पु), मुंबई- २२
- संचालक,पर्यावरण विभांग,नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ३२.
- मा.संचालक, प्रादेशिक कार्यालय, वने, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय,पश्चिम विभाग तळ मजला, पुर्व बाजू, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर.
- सहसंचालक,औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, रायगड, ६ वा मजला, कोकण भवन विस्तार, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
- सह.मुख्य विस्फोटक निरिक्षक, अ-१ व अ-२ विंग, ५ वा मजला, सीजीओ कॉम्प्लेस, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
- मा.सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत दिघी, (गावे- दिघी, करलास, नानवली, मणेरी), मु.पो. दिघी, ता. श्रीवर्धन,जि. रायगड

श्री.सागर औटी, उप-प्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी समितीच्या अध्यक्षा व सदस्य, शासकीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी व उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती बैठकीची सुरवात केली. समन्वयक यांनी सांगितले की कोव्हीड - १९ च्या पार्श्वभूमीमुळे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशांनुसार ऑनलाईन जन- सुनावणी बरोबरच प्रत्यक्ष जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. ऑनलाईन साठी सिसको वेबॅक्स लिंक चालू करण्यात आली. समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी यांनी सांगीतले की, स्थानिक वृत्तपत्रात जाहीर सूचना प्रकाशित झाल्यावर स्थानिक उप प्रादेशिक कार्यालय महाड यांस वीस आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. या सुनावणीची रुपरेखा सांगताना त्यांनी सांगितले की प्रथम प्रकल्प प्रवर्तक किंवा त्यांचे पर्यावरण सल्लागार हे प्रस्तावित प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण करतील. नंतर उपस्थितांनी त्यांचे पर्यावरणीय योजनांबाबतचे प्रश्न, सूचना, आक्षेप उपस्थित करावेत. त्यास प्रकल्प प्रवर्तक उत्तरे देतील. सदर

सुनावणीकरीता एका वेळेस १०० इतक्या मर्यादेत उपस्थितांना प्रवेश दिला जाईल व त्याप्रमाणेच पुढे १०० - १०० व्यक्तींच्या उपस्थितीत सुनावणीत सहभागी होण्याची संधी देण्यात येईल. तरी उपस्थितांनी सामाजिक अंतर (सोशल डिस्टंगसिंग) पाळावे व मुखपट्टी (मास्क) लाऊनच बसावे. ज्या कोणी व्यक्तींनी लेखी सूचना, आक्षेप आणले असतील, त्यांनी त्या म.प्र.नि. मंडळाच्या प्रतिनिधीस सुपूर्द कराव्यात. डॉ.पदमश्री बैनाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड -अलिबाग तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांचे स्वागत करुन उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. प्रत्येकास विचारण्या ची संधी देण्यात येईल असे सांगितले.

**<u>पहिल्या सत्रास उपस्थित १०० व्यक्तीपैंकी खालील व्यक्तींनी त्यांचे प्रश्न, सूचना, आक्षेप उपस्थित नमूद केले.</u>**

**१. श्री.महंमदभाई मेमन, राहणार बोर्ली पंचतन, बोर्ली गाव, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड –**

आमची स्थानिक जनता भोळी आहे. पूर्वी येथे ब-याच कंपन्यांनी आश्वासने दिली. नंतर स्थानिकां च्या तोंडाला पाने पुसली आहेत. त्यामुळे सदरहू कंपनीसुध्दा तसेच करेल असेच सर्व स्थानिकांना वाटते. त्याचप्रमाणे ब-याच कंपन्या स्थानिकांमध्ये भांडणे लावत असतात. येथील स्थानिकांना व तरुणांना शैक्षणिक सुविधा नसल्याने त्यांचे शिक्षण कमी असू शकते. तरी स्थानिकांना कंपनीने स्वतः कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी दिली, तर आमचा कंपनीस पाठिंबा राहील.

आताच सांगितले की ४६७ कायमस्वरुपी व ५३३ कंत्राटी कामगार लागतील. तर त्यास काय निकष लावणार. त्याचप्रमाणे कंपनीने फायद्यासाठी बाहेरील लोकांना व्यवसायासाठी आणले तर स्थानिक लोकांच्या रोजगाराचे काय ? ते व्यवसाय बाहेरील लोकांना न देता स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे. तरच आमंचा या प्रकल्पाला पाठिंबा राहील.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याबाबत आपल्या अटी व शर्ती कशा असाव्यात अशी विचारणा केली.

श्री महमंदभाई यांनी सांगितले की रेती व्यवसाय, खडी व्यवसाय, वाहतुक व्यवसाय यासाठी स्थानिकांना विश्वासात घ्यावे. अगदी छोट्या व्यापाराकडे जीएसटी नंबर नसतो. त्यास सहकार्य करावे. त्याचप्रमाणे सामाजिक कामेही कुठल्याही कंपन्यांनी केलेली नाहीत. तर ह्या कंपनीचीही आश्वासने फक्त कागदोपत्रीच राहतील का अशी शंका स्थानिकांना येत आहे. सर्व कंपन्यांनी काहीही शिथिल केलेले नाही, तर लोकांना मुर्ख बनविण्याचे काम केलेले आहे. जर स्थानिकांना सहकार्य केले, तरच कंपनीस पाठिंबा राहील. काही अटी या कागदापुरत्या मर्यादीत न राहता लोकांपर्यत पोहचल्या पाहिजेत. पण गरीबीचा फायदा जर कोणी घ्यायचा प्रयत्न केला तर आम्ही संघर्ष करु. मे.व्हेरीटास कंपनीला आमचा पुर्णपणे पाठींबा राहील.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी माहिती दिली की, केंद्र शासनाने प्रकल्प प्रवर्तकांना आता सामाजिक पर्यावरण जबाबादारी निधी (सीईआर - Corporate Environment Responsibility Fund) बंधनकारक करण्यात आलेला आहे. दि.०१/०५/२०१८ पासून कंपनीस गुंतवणुकीच्या ०.५%राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री.महंमदभाई यांनी विचारले की सदर बाब एका गावासाठी मर्यादित आहे. परंतु सदर परिसरात ४१ गावे आहेत, त्यांनाही लागू आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रस्ताव सादर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. परिसरातील काही सेवाभावी संस्था यांनी प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावा. कचरा निर्मूलन, टॉयलेट ब्लॉक्स, हरितपट्टा विकास यासाठी प्रकल्प प्रवर्तक निधी देऊ शकतात. यामुळे तेथील परिसराचा विकास होऊ शकतो. सीएसआर (कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी) वेगळा असून प्रकल्प जर नफ्यात असला तरच तो खर्च करण्यात येतो. प्रकल्पातील सर्व विभागात मनुष्यबळ लागते, त्यातील काही पदांना अतिरिक्त प्रशिक्षण लागत असल्यास ते देण्यात येईल. काही अकुशल पदांनाही प्रशिक्षणाची आवश्यकता असते. तेही देण्यात येईल. पद, त्यास लागणारी शैक्षणिक अहर्ता याचा तक्ता सादरीकरणात दाखविण्यात आला.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की सदरहू बाबतची म्हणजे किती पदांची भरती करणार, त्यांचा संवर्ग, पदांची संख्या, प्रशिक्षणाची गरज, कुठले प्रशिक्षण कंपनी देईल व कुठली शैक्षणिक अहर्ता असल्यास निवडीत प्राधान्य देण्यात येईल ही सर्व माहिती प्रकाशित करण्यात यावी व ग्रामपंचायतीस उपलब्ध करुन देण्यात यावी.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की, प्रशिक्षण हे आपण आपल्या कंपनीमध्येच देणार आहोत. त्यानंतर प्रशिक्षीत लोकांना आपण कंपनीमध्ये सामावून घेणार आहोत.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्थानिकांची मागणी लक्षात घेऊन प्रकल्प प्रवर्तक स्थानिकांना प्रथम आवश्यक असणारे प्रशिक्षण स्थानिक स्तरावर देणार आहात का, म्हणजे त्या लोकांना बाहेर जावे लागणार नाही अशी स्थानिकांची मागणी आहे त्याबाबत उत्तर देण्याचे निर्देश केले.त्याचप्रमाणे कंपनी स्थानिकांमधील युवक युवतींना प्रथम प्रशिक्षणासाठी अप्रेन्टिसशिप देऊन नंतर सेवेत सामाऊन घेणार का ? याबाबत सविस्तर माहिती बैठकीत देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की येथे सांगितल्याप्रमाणे आम्ही स्थानिकांना अप्रेन्टिसशिप / प्रशिक्षण देऊन परिक्षा पास झाल्यास प्रकल्पातच रोजगारीची संधी देऊ.

त्यावर, सदस्य पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सुचना केली की, स्थानिक लोकांना प्रशिक्षण तुमच्या कंपनीत देणार आहाता का ? तशी प्रशिक्षण देणारी संस्था तुम्ही तयार करणार आहात का ? आणि त्यांना नंतर सामावून घ्यायचे आहे. ती दिल्याने कंपनीचा फायदाच आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की, ४६७ हीच संख्या कशी निश्चित केली. तर आम्ही सर्व गोष्टींचा विचार करुन ती केलेली आहे. मे.व्हेरीटास कंपनी ही उत्पादन करणारी कंपनी आहे. यामध्ये २४ तास X ७ दिवस काम चालते. आम्ही स्थानिकांना रोजगार देण्याची हमी घेत आहोत. जे आम्हाला उपयुक्त लोक आहेत आणि जे जबाबदारीने काम करतील त्यांनाच संधी मिळेल.

**२. श्री.नंदकुमार गोविंद पाटील, राहणार बोर्ली पंचतन, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

सदरहू प्रकल्पामुळे पर्यावरणास धोका आहे. येथे पर्यटन व्यवसाय आहे. मच्छिमारी व्यवसायाचा प्रकल्पातील दुषित वायुमुळे स्थानिकांना,वनस्पतींना व पशुपक्षांना त्रास होऊ शकतो. आपण उभारणार असलेल्या प्रकल्प हा वेळेत होणार आहे का ? का हा प्रकल्प फक्त उभा करणार व निघून जाणार का ? प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा या कायमस्वरुपी असणार का ? पुर्वी परिसरात आलेल्या कंपन्यांनी स्थानिकांमध्ये दुफळी माजवली आहे. अशी प्रकल्प महाड, रोहा किंवा इतर एमआयडीसी मध्ये न जाता दिघी मध्येच का ? कंपनी जे पाणी समुद्रातून घेणार आहे व समुद्रात परत सोडणार आहे त्याच्यामुळे नुकसान होणार नाही याची हमी देणार आहात

का ? या आधी आलेल्या कंपन्यांमुळे स्थानिक मच्छिमारांचे, कोळी समाजाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. होडयांवर काय परिणाम होणार आहे. किती ग्रामपंचायतींना व सदस्यांना आपण कळविले आहे. सद्या: कोव्हीड - १९ चा प्रादुर्भाव सर्वत्र पसरला असताना कंपनीला जनसुनावणी घेण्याची काय घाई आहे ? अनेक रूग्ण आज या जनसुनावणीस उपस्थित राहू शकले नाहीत. कंपनीने अगोदरच चार वर्षांपूर्वी परिसरातील ग्रामपंचायतींना प्रकल्पाविषयी व रोजगारीविषयी आगाऊ सूचना / माहिती कळविली असती, तर आतापावेतो बरेच स्थानिक प्रशिक्षित युवक तयार झाले असते. कोव्हीडमुळे बरेच स्थानिक या बैठकीस येऊ शकले नाही. तरीही ही जनसुनावणी परत घेण्यात यावी. त्यांनी आक्षेप नोंदविताना विचारले की जर वादळ आले तर प्रकल्पासाठी काय उपाययोजना राबवविणार, भोपाळसारखी १९८४ मधील दुर्घटना परत झाल्यास परिसरातील ४१ गावातील सर्वांना त्रास होईल. त्यासाठी कंपनी काय उपाययोजना करणार आहे. सर्वांचा अनुभव आहे की, येथील स्थानिकांना प्रकल्पातील स्थान न देता महाराष्ट्रा बाहेरील लोकांना दिले जाते. मे.व्हेरीटास कंपनीने प्रकल्प माहिती ४१ ग्रामपंचायतींना देणे आवश्यक आहे. सीएसआर फंड श्रीवर्धन तालुक्याला किती मिळणार आहे. स्थानिक रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे. त्यासाठी प्रकल्प प्रवर्तक किती खर्च करणार याबाबत काहीही खुलासा नाही. तरीही हा प्रकल्प कार्यरत होऊ नये. कोव्हीड - १९ काळातही जनसुनावणी लोकांनी येऊ नये म्हणून घेण्यात आलेली आहे. शासनाने प्रकल्प सुरु करण्यास परवानगी दिली तर त्याच्याविरुध्द आम्ही उच्च न्यायालयात दावा लावणार आहोत.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती दिली की, कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊन मार्च २०२० मध्ये घोषित करण्यात आलेला होता. आता अनलॉक प्रक्रिया सुरु झालेली आहे. आपल्याला कोरोनासोबत लस येईपर्यंत जगायचे आहे. त्यासाठी सामाजिक अंतर (सोशल डिस्टिंगसिंग) पाळणे, मुखपट्टी लावणे आवश्यक आहे. शासनाने आपल्या सूचनांचा विचार करुनच ऑन लाईन बरोबरच १०० व्यक्तींच्या गटा गटास सर्व निर्देश पाळून प्रत्यक्ष जनसुनावणी आयोजित करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. आपल्याला करोना सोबत जगायचे आहे. Mission begin again या महाराष्ट्र सरकारच्या धोरणा अंतर्गतच आपण हा जनसुनावणीचा कार्यक्रम घेत आहोत. जोपर्यंत या रोगावर औषध निघत नाही तोपर्यत आपण सोशल डिस्टंसिंग ठेवून काम करत आहोत. त्यामुळे ऑनलाईनबरोबरच येथे प्रत्यक्ष बैठक घेण्यात येत आहे. त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना उपस्थित केलेल्या आक्षेपांवर स्पष्टीकरण देण्यास सांगितले.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, तुमचा प्रश्न होता की आम्ही हे करतोय ते पूर्ण करणार का अर्धवट सोडणार. त्यास आम्ही आश्वासन देतो की सर्व कामे पूर्णपणे करणार आहोत. आजची जनसुनावणी ही ऑनलाईन पध्दतीने आणि प्रकल्प स्थळाजवळ देखील सुरू आहे. भोपाळसारखी दुर्घटना या प्रकल्पात होणार नाही. कारण येथे कोणताही विषारी वायू वापरला जात नाही. गॅस साठवण टर्मिनलमध्ये माऊंडेड बुलेट्स स्वरुपात असेल. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे पर्यावरण संरक्षणासाठी सर्व प्रकल्पांवर बारीक लक्ष असते. सेन्सर कार्यान्वित करुन स्वयंचलीत ऑनलाईन लक्ष महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ प्रकल्पातील प्रदूषण नियंत्रणावर ठेवत असते. प्रकल्पात आवश्यक असणारी मनुष्यबळ व शैक्षणिक अहर्ता यांची सर्व माहिती १० कि.मी. परिघातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयात ( दिघी, मनोरी, करलास,नानवली, सावर्डे,आदिवासी वाडी) आणि मुरुड येथील आय.टी.आय. संस्थेस उपलब्ध करण्यात येईल व स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. आय. टी.आय. मुरुड बरोबर नविन वर्षीच्या अभ्यासक्रमांसाठी तरतुद करण्यात येईल. प्रकल्पात भुकंप, चक्रीवादळा पासून संरक्षण सयंत्रणा/आपत्कालिन व्यवस्थापन योजना (Disaster Management Plan) कार्यान्वित करण्यात आलेली आहे. प्रकल्पामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होणार नाही. कारण समुद्राचे पाणी डिसलिनेशन प्रकल्प (आर.ओ.प्रक्रिया) हा समुद्राचे पाणी वापरण्यासाठी आहे.

**३. श्री.राजेश कासारे, बौध्दवाडी, दीघी गाव, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

मी प्रत्येक उत्पादनाबाबत मत मांडणार आहे. प्रकल्प एकात्मिक प्रकल्प आहे. गॅस स्टोअरेज प्रकल्प आहे. येथील शुध्द वातावरण कंपनीमुळे प्रदूषित होईल. जर जीवनाची हानी होणार असेल, तर असे जीवघेणे प्रकल्प गावात, पंचक्रोशीत हवेत कशाला ? गावातील, पंचक्रोशीतील बौध्द समाजाचा या प्रकल्पास विरोध आहे.

**४. श्री.ऋषिकेश गोळे, बोर्ली पंचतन, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

कंपनीचे प्रकल्पाचा कार्यकारी सारांश अहवाल सामान्य माणसांना आगाऊ उपलब्ध का करुन दिला नाही ? समुद्राचे पाणी किती वापरणार व त्याचा वापर कसा करणार याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. वापरलेले पाणी परत कुठे सोडणार याबाबत काहीही उल्लेख नाही. स्थानिक मच्छीमारी समाजाच्या उपजीविकेवर परिणाम होणार आहे. कोकणात बरेच प्रकल्प आले. त्यावेळी असेच सांगत असत. चिपळूणला मे.घरडा कंपनी आणि काही रासायनिक कंपन्या आहेत. तेथेही सेन्सर असून प्रदूषण झालेले आहे. मे.जे.एस.डब्ल्यू वायूगळतीमुळे परिसराची हानी झालेली आहे. तेथेही भातशेती पीक येत नाही. सादरीकरणात मासेमारीबाबत काहीही उल्लेख नाही, असे प्रकल्प भारतात इतरत्र कुठे आहेत व त्याची स्थिती काय, यशस्वी आहे काय ? याबाबत कुठेही माहिती नाही. बैठकीत स्थानिक व्यक्ती श्री महंमदभाई मेमन यांनी उपस्थित केलेल्या मुद्दांवर त्यांनी पाठिंबा दर्शविला.

श्री.गोळे यांनी सूचना केली की, कंपनीने स्थानिक युवकांची अधिकृत विक्रता (व्हेन्डर) बनण्यासाठी कागदपत्रांची यादी प्रसिध्द करावी. मासेमारीवर किती परिणाम होईल याची माहिती द्यावी. जवळच ऐतिहासिक वारसा असलेला मुरुड-जंजिरा किल्ला आहे. तर असा प्रकल्प हा किल्ल्याजवळ आणण्यास शासनाने परवानगी दिली आहे काय ?

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की, संबंधित व्यक्तींनी मुद्दे अतिशय योग्य प्रकारे मांडले. त्यांनी सांगितले की ऐतिहासिक वारसाबाबत आपण केलेली विचारणा योग्य आहे. शासनाने मुरुड-जंजिरा विचार करुनच मान्यता दिलेली आहे. पर्यावरण विभागाचे त्याबाबत निर्देश प्रकल्प प्रवर्तकांना देण्यात येतील. त्याचप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक फक्त आश्वासन देतील व पर्यावरण संरक्षण योजना राबवविणार नाहीत अशी शंका उपस्थित करण्यात आली. तर मा.अध्यक्षांच्यावतीने प्रकल्प प्रवर्तकांना सूचना करण्यात येते की, त्यांनी आश्वासन पुर्ती लेखी स्वरुपात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास सादर करावी. मे. घरडा कंपनीच्या परिसरात १० वर्षापुर्वी जी परिस्थिती होती त्याबाबत खूप सुधारणा झालेली आहे. मे.जे.एस.डब्ल्यू येथे विद्युत उपकरण गळतीमुळे हानी झाली होती त्यांनासुध्दा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने चांगलाच दंड नोटीस ठोठावली आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी भविष्यात मासेमारीवर काय परिणाम होईल का याबाबत बैठकीत स्पष्टीकरण देण्यास सांगितले.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सदर प्रकल्पाचा पर्यावरण मुल्यांकन अहवाल हा एक महिन्याआधी १० कि.मी च्या परिसरात वाटण्यात आलेले आहेत. तसेच सर्व शासकीय कार्यालयामध्ये देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या संकेतस्थलावर सुध्दा हि प्रत प्रसिध्द केलेली आहे. समुद्राचे पाणी हा आमचा पाण्याचा स्त्रोत आहे. त्यातून तयार झालेले औद्योगिक सांडपाण्याचा पुर्नवापर प्रकल्पातच उत्पादनासाठी करणयात येईल. उरलेले पाणी समुद्रात सोडणार आहोत. समुद्राच्या पाण्यासाठी डिफ्युझरमधून ते समुद्रात सोडण्यात येईल. अशा प्रकल्पाचा सविस्तर अभियांत्रिकी, प्रतिकृती तयार करून त्याचे समुद्रात सोडण्याचे ठिकाण सुनिश्चित केलेले आहे. हया सर्व तांत्रिक बाबी आम्हाला वने व पर्यावरण मंत्रालय,

नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात येतात. श्री.गोळे यांनी यावर आक्षेप नोंदविला की, तुम्ही सदर माहिती आम्हाला दिली नाहीत जी तुम्हा आता देत आहात. येथील मच्छिमार हा १० ते २० मिटर मध्ये मच्छिमारी करत नसून आत खोल समुद्रामध्ये जातो. तुमचे सांडपाणी समुद्रात जाऊन मिळणार यामुळे मच्छिमारीवर परिणाम होणार, डांबर प्रकल्पाचे क्षारयुक्तपाणी समुद्रात मिसळणार असा अक्षेप नोंदविला त्यावर प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले कि, डांबर प्रकल्पात पाणी हे फक्त कुलींगसाठीच वापरण्यात येईल. डांबर उत्पादन प्रक्रियेत उपयोगात घेत नाहीत. त्याचप्रमाणे पॉलिमर पाण्याचा सीओडी फक्त ३०-४० मि.ग्रॅम प्रति लिटर असेल. कंपनी सर्व पाण्याचा पुर्नवापर करणार आहे. तशी लेखी हमी आम्ही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास दिलेली आहे. श्री गोळे यांनी आक्षेप नोंदविला आहे की, परिसरातील सर्व कंपन्या येथे अगोदर फक्त आश्वासन देतात, पण पुढे स्थानिकांनाच प्रदूषणाचा त्रास सहन करावा लागतो. त्यावर पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की सर्व औद्योगिक सांडपाण्याचा पुर्नवापर करण्यात येईल व डिसलिनेशन प्रकल्पाचे पाणी समुद्रात सोडण्यात येईल. अ

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी माहिती पुस्तीका संबंधित व्यक्तीस उपलब्ध करुन देणार का ? याबाबत विचारणा केली व संकेत स्थळावरुन डाऊनलोड करण्याची सूचना केली. श्री वाखलकर यांनी प्रकल्पाला विरोध केला.

**५. श्री.अमित कासारे, गाव दिघी, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

जनसुनावणीस उपस्थित असलेले लोक हे भोळे, अशिक्षित आहेत. त्यांना कंपनीची उत्पादन प्रक्रिया काय आहे हे समजत नाही. कंपनीने उत्पादन करताना पर्यावरणावर, मासेमारीवर काय परिणाम होतील याचा उल्लेख नाही.

कंपनीचे मसुदा मुल्यांकन अहवाल पुस्तिका यातील पान नं. १७ वर आवाजाचे परिणाम यात व्यवसायाच्या आरोग्यावर होणा-या आवाजाचे परिणाम योग्य शिफ्टची वेळ व संबंधित कर्मचा-यांच्या वार्षिक ऑडिओलॉजिकल तपासणीव्दारे कमी केले जातील. म्हणजे येथे काम करणा-यांवर परिणाम होणार असे कंपनी कबूल करत आहे. म्हणजे येथे काम करणा-या कामगारास काही वर्षांनी बहिरेपण येणार. यास आमचा कायमचा विरोध आहे. त्याचप्रमाणे जमिन दुषित होणे, वाहतुकीमुळे तेल गळती होणे याबाबत सादरीकरणात काहीही सांगितले नाही. तेल व ग्रीस गळणे, कचरा, धोकादायक रसायने वाहून नेणारे ट्रक्स जाणार, ते ऊभे राहणार त्यामुळे लहान रस्त्यांवर लोकांना त्रास होणार, अपघात होणार. अशी तेल गळती जंगल विभाग, लोकवस्तीत झाल्यास परिणाम भयानक होतील. सदरहू कंपनी ही एमआयडीसीत उभी करा. सदरहू प्रकल्पास आमचा विरोध विरोध आहे. दिघी पोर्ट परिसरात सद्या: कार्यरत असणाऱ्या प्रकल्पामुळे जेवढा धोका नाही तेवढा धोका या प्रकल्पामुळे आहे.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना सुचना केली की, आपण ध्वनी तीव्रता, वायु यामुळे लोकांच्या आरोग्यांवर होणारे परिणाम हा तुमचा अभ्यास आहे. त्याच प्रमाणे ऑईल साठवणूक, वाहनांपासून होणारी गळती, कचरा साठवणूक यामुळे होणारे अपघात याचे तुम्ही योग्य पध्दतीने उत्तर देणे अपेक्षीत आहे.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) अहवाल तयार करताना संपूर्ण प्रकल्पाचा विचार करण्यात आलेला आहे. प्रकल्पात आवाज उत्पन्न होणा-या विभागातील कामगारांची वेळोवेळी ऑडिओलॉजी चाचणी औद्योगिक कायद्यानुसार घेण्यात येणार आहे. प्रकल्पात कार्यरत असताना लहान वर्कशॉपमध्ये आवाज जास्त येतो. प्रकल्पात औद्योगिक कायद्यानुसार सर्व निर्देश पाळण्यात येतील. आवाज उत्पन्न होणा-या सयंत्राची वेळोवेळी देखभाल, कामगारांना आत्याधुनीक इअर प्लग पुरविण्यात

येतील. पर्यावरण व्यवस्थापन मसुदा मध्ये त्याचे नियोजन केलेले आहे. रासायनिक प्रकल्पातील तेल गळती टाळण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.कासारे यांनी मत मांडले की एवढी सयंत्रणा उभारुन जर कामगार बहिरा होणार असेल, तर हा प्रकल्प येथे नको. एमआयडीसीत तो न्यावा. त्यांनी पुढे सांगितले की त्यांना मिळविलेल्या माहितीनुसार असे प्रकल्प हे जेथे लोकवस्ती अजिबात नाही, तेथेच कार्यान्वित करतात. जर परिणाम हानीकारक असतील, तर अशा कंपनीस आमचा विरोध आहे. जर अशा घातक प्रकल्पात काम करुन पाच वर्षात मरणार असेल, तर त्याऐवजी आहे त्या स्थितीत इतर साध्या कंपनीत रोजंदारीवर काम करुन जगलेले काय वाईट. आमचा प्रकल्पास तीव्र विरोध आहे.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागारांना विचारले की तुमचा अभ्यास व अहवालानुसार श्री.कासार यांनी प्रश्न विचारला. तेलाची साठवणूक, वाहनांपासून होणारी गळती, आवाजाचा प्रकल्पात होणारा त्रास, याबाबत आपल्या अहवालावर त्यांनी आक्षेप नोंदविले आहेत. यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पुढील उत्तर देण्यास सांगितले.

पर्यावरण सल्लागार य़ांनी सांगितले की सर्व प्रकल्पाचा विचार करुन भविष्यातील कदाचित उद्भणाऱ्या गोष्टींचा विचार करुन हा अहवाल केलेला असतो. कारखाने अधिनियम पाळण्यात येणार आहे व त्यासाठी सर्व आर्थिक तरतुद केलेली आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी काही मुद्दे वाचून दाखविले. त्यात त्यांनी देखभालीचे मुद्दे उपस्थितांना वाचून दाखविले. यंत्र व उपकरणे पासून ज्या तेलची गळती जमीनीवर होईल ते एका ड्रम मध्ये जमा केले जाईल व व नियमानुसार त्याची विल्हेवाट लावली जाईल. यंत्र मधील गळती ही डीसीएस तंत्रज्ञानाव्दारे कमी करण्यात येईल. घातक व टाकून दिलेले यंत्र, कचरा, केमिकल्सची वाहतूक ही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार बंद वाहनातून करण्यात येईल. प्रकल्पात सर्व ठिकाणी गळती नियंत्रके (सेंन्सर) टाकण्यात येईल. जवळच्या जागेतील जमिनीचे व पर्यावरणाचे देखरेख केले जाईल. कोणत्याही परिस्थितीत मोकळया जागेमध्ये कचरा साठवला जाणार नाही इ.

**६. श्री.सुशांत पाटील, राहणार वडवली, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

कंपनीमुळे भविष्यात मासेमारीवर परिणाम / नुकसान झाल्यास त्याची हमी काय देणार ? ती भरुन देण्याची हमी द्यावी, स्थानिकांना ८० % रोजगाराच्या संधी व प्राधान्य देण्यात यावे, त्यांना रोजगारासाठी सक्षम करुन रोजगार देण्यात यावा. फक्त स्थानिकांनाच रोजगार देण्यात यावा. तरच प्रकल्पास मान्यता देण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की स्थानिकांना रोजगारात संधी दिल्याने प्रकल्पाचा फायदाच होणार आहे. त्यामुळे स्थानिकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रकल्पात ४६७ व्यक्तींची गरज आहे. त्यात शैक्षणिक अर्हता असणा-या स्थानिक व्यक्तींना प्राधान्य देण्यात येईल. काही कुशल व्यक्तींना निवड करताना प्रशिक्षणाची गरज असल्यास ती कंपनीतच देऊन त्यांना रोजगाराची संधी देण्यात येईल.

प्रकल्पात समुद्राचे पाणी वापरण्यास घेतल्यावर ते परत समुद्रात सोडण्यात येईल. टप्प्याटप्प्यात सोडण्यात येईल. सदरहू पाण्यात केमिकल राहणार नाही. त्यात फक्त मीठ असते. त्याचा परिणाम माश्यांवर होत नाही. हा सर्व अहवाल आपण शासनाच्या विविध विभागात दिलेला आहे.

अध्यक्षांनी निर्देशांप्रमाणेच सोशल डिस्टंसिंग पाळून पुढील बॅच घेण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी उपस्थितांचे **दुसऱ्या सत्रासाठी** उपस्थितांचे स्वागत करुन सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची व पर्यावरण व्यवस्थापन योजनांची माहिती दिली. उपस्थितांना प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, हरकती नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

**दुसऱ्या सत्रास उपस्थित १०० व्यक्तीपैंकी खालील व्यक्तींनी त्यांचे प्रश्न, सूचना, आक्षेप उपस्थित नमूद केले.**

**१. श्री.लक्ष्मण हरी मेंदाडकर, माजी उपसरपंच, दीघी ग्रामपंचायत, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड व अध्यक्ष, एकविरा मच्छीमार सोसायटी -**

सदरहू प्रकल्पामुळे सर्व कोळी समाज हा बाधित होणार आहे. दि.१५/०३/२०१९ रोजी मे.आदित्य एन्व्हॉरेमेंटचे लोक गावात आलेले होते. त्यांनी कोणतीही पूर्वसूचना दिलेली नव्हती. त्यांना दाखला हातात आहे का ? याबाबत विचारणा केली असता त्यांनी मत्स्य विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र दाखविले. आमच्या कडून प्रतिक्रीया व मागणी पत्र घेतले. परंतु मे.व्हेरीटास कंपनी येथे स्थापित होणार आहे याची पुर्व कल्पना दिली गेली नाही. म्हणजे त्यांनी आमची फसवणूक केली.

श्री.मेंदाडकर यांनी सांगितले की २००६-२००७ मध्ये दीघी बंदराची स्थापना झाली. त्या अगोदर येथे मच्छीमारी हा येथील मुख्य व्यवसाय असून लोक सुखी समाधानी होते. मात्र दीघी बंदर स्थापन झाल्यापासून जहाजांची ये-जा सुरु झाली व मच्छीमारी नष्ट झाली. समुद्राच्या पाण्याच्या प्रदूषणात वाढ झाली. दोन वेळेचे पोटभर जेवण वर्षभर मिळत होते, ते बंद झाले. त्यावेळेस बारमाही मिळणारी मच्छीमारी बंद झाली. कांदळवनाची (मँग्रोव्हज्) सर्रास कत्तल करण्यात आली. एका दिघी बंदरामुळे दीघी गाव उध्वस्त झाले. त्यांनी सांगितले की, आपण या प्रकल्पाबद्‌ल खूप सारी माहिती दिली आणि आमचे काही गावकरी ऑन लाईन पध्दतीने आपल्या जनसुनावणीत सामाविष्ट होणार आहेत. आता जनसुनावणी होत असलेल्या प्रकल्पात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष किती रोजगाराच्या संधी मिळणार आहेत याबाबत सविस्तर माहिती सांगण्यात येत नाही. समुद्रात सोडणाऱ्या सांडपाण्यामुळे मच्छिमारी धोक्यात येईल जो आमचा मुख्य रोजगार आहे. म्हणून आमच्या कोळी समाजातर्फे पुर्ण विरोध आहे. प्रकल्पासाठी अतिरिक्त पाणी लागत असल्याने पिण्या च्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवेल. जनसुनावणी ऑनलाईन घेण्यास ब-याच तांत्रिक अडचणी येतात. प्रकल्पा पासून कोणाताही धोका नाही, प्रदूषण होणार नाही असे लेखी प्रकल्प प्रवर्तक देणार का ?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, आयुक्त मत्स्य व्यवसाय यांचेकडून दोन प्रकल्प आम्ही रावबले आहेत. आगरदंडा आणि दिघी या दोन ठिकाणी नाबार्ड कडून काही प्रकल्प राबण्याची योजना भविष्यात आहे. तसेच मे.व्हेरीटासचा प्रकल्प आमच्याकडे आहे त्यासाठी आमच्या दोन वेगळे संघ कार्यान्वीत होते. कोळी समाजात जो संघ आला तो मत्स्य व्यवसायाशी संबंधीत होता. त्यांनी आपल्या समस्या हया आयुक्तांकडे पाठवण्याचे योग्य काम केलेले आहे. मासेमारीचे काहीही नुकसान होणार नाही. प्रदूषण करुन कारखाना आमचा बंद करायचा नाही. आम्हांला येथील पाणी वापरायचे नाही, म्हणून आम्ही समुद्राचे पाणी घेत आहोत. सर्व औद्योगिक सांडपाणी आम्ही परत प्रकल्पातच वापरणार आहोत. मच्छिमारीला धोका होईल असे आम्ही काहीही करणार नाही. स्थानिकांनी त्यांच्या गरजा कळवाव्यात. प्रकल्पापासून कुठलाही धोका नाही. तरी स्थानिकांनी सहकार्य करावे. समुद्राचे पाणी प्रकल्पातील प्रक्रियेसाठी घेणार आहोत. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होणार नाही.

तददरम्यान अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, ऑनलाईन जनसुनावणी ही व्यवस्थित चालू असून पर्यावरण समिती जनसुनावणी येथेही बघत आहे.

**२. श्री.हरिश गजानन दीघीकर, राहणार गाव दिघी ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

ज्या स्लाईडस् लावल्या आहेत त्या दिसत नाही अशी सूचना केली. त्यांनी आक्षेप नोंदविला की मच्छीमारांची काळजी घेऊ असे सर्वच कंपन्या सुरु करण्याच्या अगोदर सांगतात. दीघी बंदर २००७ पासून कार्यरत आहे. तेथे दोन कामगार संघटना कार्यरत आहेत. मोजून १०-१२ कामगार काम करत आहेत. यापुर्वी दिघी पोर्टने बरीच आश्वासने दिली होती. त्यापैकी एकही आश्वासन त्या दीघी पोर्टने पाळलेले नाही. आम्ही मच्छीमारी आमच्यासाठी करत नाही, कंपनीसाठी करत नाही, तर जनतेसाठी करत असतो. कंपनीमुळे मच्छीमारीवर परिणाम होणार नाही याचे ठाम आश्वासन कंपनीने द्यावे.

त्यावेळी पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टपणे उत्तर दिले की, सदरहू प्रकल्पामुळे कुठलाही परिणाम मच्छिमारीवर होणार नाही. आम्हीपण महाराष्ट्रीयन आहोत. आम्हांला कोळीबांधवांचे कुठलेही नुकसान करायचे नाही.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे अभिप्राय दिला की, बैठकीत श्री. दीघीकर यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे योग्य आहेत. प्रकल्पामुळे येथील मच्छीमारीवर परिणाम होईल का व त्यावर काय उपाययोजना करणार हे उत्तर उपस्थितांना हवे आहे. नुसती काळजी घेऊ हे उत्तर देणे योग्य नाही.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की मी ठामपणे सांगतो भविष्यात मच्छिमारीवर कोणताही परिणाम होणार नाही. औद्योगिक सांडपाण्याचा पुर्नवापर होणार आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित जनसमुदयास सुचना केली की, भाषण न देता जे आपले महत्वाचे मुद्दे आहेत ते आपण विचारा.

**३. श्री.किरण कांदेकर, राहणार दिघी, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

जर स्फोट होऊ नये म्हणून गॅसची टाकी जमिनीखाली बांधणार आहेत, तर जमिनीत स्फोट होत नाहीत का ? याबाबत खुलासा करावा. गावाला कायमचा धोका होणार आहे. कामगारांच्या निष्काळजीपणा मुळे स्फोट होणार नाही का ?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की, गॅस साठवण टाकी ही माऊंडेड बुलेट्स साठी आहे. हया गॅस साठवण बुलेट्स पुर्णपणे वाळूनी झाकलेले असतील तसेच आर.सी.सी. भिंत बांधणार आहेत. हया बुलेट्स मध्ये स्फोट होण्याचे कारण नाही कारण आतील अधिकृत दाबाच्या दुप्पट दाब (प्रेशरच्या) पटीने त्याची आखणी केलेलीआहे. तसेच यांची आखणी करण्यासाठी आम्ही आय.आय.टी. मुंबई व टेक्नीक एफ.एम.सी. सारख्या अधिकृत तांत्रिक सल्लागारांची मदत घेणार आहोत. माऊंडेड बुलेट्स वाळु आणि आर.सी.सी भिंतीनी बंदीस्त असतात आणि तिथे कुठलाही कामगार आत जात नाही. त्यामुळे कामगारांच्या निष्काळजी पणामुळे स्फोट होण्याची भीती नाही.

श्री कांदेकर यांनी आक्षेप नोंदविला की, दिघी पोर्ट हया कंपनीकडे फक्त आयात व निर्यात करण्याची परवानगी आहे. पण आपली कंपनी उत्पादन करणारी आहे आणि त्यामुळे प्रदुषण नानवली व दिघी गावामध्ये होणार आहे. प्रस्तावित कंपनी ही उत्पादन प्रक्रिया सुरु करेल. येथील स्थानिकांचा विविध कंपन्यांविषयी अनुभव चांगला नाही. आपल्या उत्पादनप्रक्रियेमुळे प्रदूषणात वाढ होईल. मासेमारीवर निश्चितच परिणाम होईल. त्यामुळे

उत्पादन प्रक्रिया नको, आश्वासन नको. जर कंपनी सुरु करण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही जन आंदोलन करुन जीवीतहानी करुन घेऊ. येथे कुठल्याच कंपनीचे उत्पादन प्रकिया नको.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की उत्पादन प्रक्रिया सुरु करण्यास दीघी बंदर प्रशासनाची मान्यता आहे. दिघी पोर्ट यांचा मालकी हक्क महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डकडे आहे. तसेच महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डकडून येणाऱ्या प्रकल्पासाठी अभिनंदन पत्र मिळालेले आहे. ही प्रस्तावित प्रकल्पासाठी जनसुनावणी आहे, आपण या प्रकल्पासंदर्भात तसेच पर्यावरण संदर्भात प्रश्न विचारू शकता.

**४. श्री.हरिदास गणपत पाटील, दीघी कोळीवाडा, ता.श्रीवर्धन, जि.रायगड :-**

कोळी बांधव समुद्रास सागर देवता मानतात. कार्यकारी सारांश अहवालानुसार खारे पाण्यावर प्रक्रिया करुन ते गोड करुन परत समुद्रात सोडणार आहे. ते स्लो पॉयझनिंग असेल. या हानीकारक प्रकल्पाचा निषेध करतो. प्रकल्पास आमचा तीव्र विरोध आहे. निषेध आहे.

**५. श्री.देविदास चंद्रकांत कावळे,माजी सभापती, श्रीवर्धन पंचायत समिती ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

येथील भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीनुसार १०० % पारंपारिक मच्छीमारी व्यवसाय करत असे. येथील सर्वजण गुण्या गोविंदाने राहत होते. ब-याच कंपन्यांनी भरपुर आश्वासने दिलेली होती. कोळी बांधवां साठी कोल्ड स्टोअरेज बांधून देऊ, दवाखाने बांधून देऊ, जेटी देऊ, काहीही झालेले नाही. भोळ्या कोळी समाजाची फसवणूक झालेली आहे. ताप आला तर डॉक्टर नाही. भविष्यात कोळी समाज नष्ट होईल. दिघी बंदर प्रशासनाने विश्वासात न घेता परस्पर चॅनेल टाकून घेतले. त्यामुळे 70% डोली व्यवसायावर परिणाम झालेला आहे. या व्हेरिटास कंपनीला आमचा पूर्ण कोळी बांधवाचा प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प सल्लागारांना सी.ई.आर. (व्यवस्थापन पर्यावरणीय जबाबदारी) बद्दल आणि त्याची कार्यपद्धती कशी असेल, आणखी माहिती देण्यासाठी सुचना केली.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की, सी.ई.आर. (व्यवस्थापन पर्यावरणीय जबाबदारी) मध्ये रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रशिक्षण यावर हा नीधी खर्च केला जातो.

**६. श्री जनार्धन कवारी, चेअरमन, माऊली कृपा संस्था, दिघी, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

२५ एप्रिल, २००८ ला दिघी बंदरा बरोबर करार झाला. त्यात फसवणूक झालेली आहे. प्रकल्पात समुद्राचे खारे पाणी गोडे करुन परत समुद्रात सोडणार आहेत. येथून ३.५ कि.मी. मुरुड जंजिरा किल्ला आहे. येथे सर्वांनीच आश्वासने दिलेली होती की दवाखाने बांधू, रस्ते दुरुस्त करुन देऊ, मच्छिमारांना सोयीसुविधा देऊ. मात्र काहीही केलेले नाही. आमचा प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी निधीबाबत माहिती देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सविस्तर माहिती देताना सांगितले कीकेंद्र शासनाने प्रकल्प प्रवर्तकांना आता सामाजिक पर्यावरण जबाबादारी निधी (सीईआर – Corporate Environment Responsibility Fund) बंधनकारक करण्यात आलेला आहे. दि.०४/०५/२०१८ पासून कंपनीस गुंतवणुकीच्या ०.५० % राखीव ठेवणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार १० कि.मी. परिघातील गावांना त्यांच्या गरजा जर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रस्ताव आल्यास त्यावर निश्चितपणे कार्यवाही होईल.

मा.अध्यक्षा, यांनी सुचना केली की, महिला वर्गास बोलण्याची संधी द्यावी. येथे महिला वर्गाची उपस्थिती लक्षणीय आहे.

**७. श्रीम.वनिता नारायण चिकाटी, दीघी कोळीवाडा, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

श्रीम.वनिता नारायण चिकाटी म्हणाल्या की, आम्ही मरु पण आम्ही प्रकल्प होऊ देणार नाही. या प्रकल्पाला आमचा पुर्णपणे विरोध आहे. आमच्या कोळी बांधवांची खाडी ही आई आहे. खाडी हे आमचे जीवन आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, काही मुद्दे पुन्हा पुन्हा येत आहेत. आम्ही आपले म्हणणे नोंद करून घेतलेले आहे. कोणालाही लेखी स्वरूपात निवेदने द्यायचे असतील तर त्यांनी जमा करावे.

प्रकल्प प्रवर्तकांनी उपस्थितांचे **तिसऱ्या सत्रासाठी** उपस्थितांचे स्वागत करुन सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची व पर्यावरण व्यवस्थापन योजनांची माहिती दिली. उपस्थितांना प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, हरकती नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मागच्या बैठकीत तांत्रीक शब्द न कळल्याने माऊंडेड बुलेट्सचे स्पष्टीकरण देण्यास सांगितले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की, माऊंडेड बुलेट्स म्हणजे गॅस साठवणसाठी आहे. ते योग्या रितीने झाकलेले असतात. याचा कुठलाही धोका नाही.

**तिसऱ्या सत्रास उपस्थित १०० व्यक्तीपैंकी खालील व्यक्तींनी त्यांचे प्रश्न, सूचना, आक्षेप उपस्थित नमूद केले.**

**१. श्री शामकांत वसंत भोकरे, उपजिल्हा प्रमुख, शिवसेना, माजी सदस्य, रायगड जिल्हा परिषद -**

श्री शामकांत वसंत भोकरे यांनी सांगितले की, सर्व कोळी बांधवांचा उद्रेक होत आहे. सर्वजण एक होऊन चालते व्हा असा २००८ ला दीघी प्रकल्पास नारा दिला होता. तो आता परत देणार आहेत. कारण दिघी बंदर यांनी दिघी गावातील लोकांसाठी आजपर्यत काहीही केलेले नाही. आज आमची स्थिती गंभीर आहे. मच्छीमारी संकटात आलेली आहे. सर्व कंपन्यांनी खोटी आश्वासने दिली. मच्छीमारांना प्यायला पाणी अजूनही दिलेले नाही. आता भावनांचा उद्रेक होणार आहे. स्थानिकांना सक्षम करा. आमचा प्रकल्पास विरोध आहे. येथे जो अधिकारी वर्ग आलेले आहेत त्यांनी येथून चालते व्हावे कारण हया प्रकल्पास आमचा पुर्णपणे विरोध आहे.

**२. श्री.अनिल नवगणे, शिवसेना जिल्हाप्रमुख, रायगड -**

श्री.अनिल नवगणे यांनी सांगितले की, प्रकल्पामुळे पर्यावरणाचा तोटा होणार आहे. विविध प्रकल्पा मुळे मच्छिमारी संपली. ती पूर्णपणे नष्ट होईल. शिवसेना प्रकल्प बंद पाडेल. तरी ही जनसुनावणी त्वरित थांबवा. प्रकल्पाचा एकही वीट आम्ही लावून देणार नाही.

**३. श्री.परवेज अजबेगी, राहणार करलास गांव, ता. श्रीवर्धन, जि. रायगड:-**

श्री.परवेज अजबेगी यांनी सांगितले की, सदरहू कंपनी ही विषबाधित कंपनी आहे. स्थानिकांना या प्रकल्पाचा काय फायदा मिळणार ? भोपाळ, विशाखापट्टण येथे प्रकल्पात अपघात झाले. गरीब लोक मेले. हा प्रकल्प येथून दीघी बंदर पासून ४० - ५० कि.मी. दूर अंतरावर घेवून जा आमचा हया प्रकल्पाला कोणताही विरोध नसेल. येथील पर्यावरणाचा ऱ्हास होईल.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत सुचना दिली आपण भाषण न करता प्रकल्पासंदर्भात प्रश्न विचारावेत आणि प्रत्येकाला प्रश्न विचारण्याची संधी मिळाली पाहिजे.

प्रकल्प सल्लागारांनी उत्तर दिले की, उत्पादन प्रक्रियेत कुठलाही विषारी वायुचे उत्सर्जन होत नाही. या प्रकल्पामुळे कुठलीही जिवित हानी होणार नाही.

**४. सौ.सुमती नामदेव शिवणे, राहणार नानवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड:-**

सौ.सुमती नामदेव शिवणे यांनी सांगितले की, आम्हाला प्रकल्पच नको आहे. तर आम्हांला प्रश्न उत्तर देण्याची गरजच नाही. येथे आम्ही ऊनात किती तास बसलो. तुम्ही काहीही केले नाही. तर कंपनी टाकल्यावर आपण काय देणार, आम्हांला कंपनी नको आहे.

**५. श्री.मंगेश जगन्नाथ गुणाजी, राहणार दीघी कोळीवाडा, ता.श्रीवर्धन, जि. रायगड -**

श्री.मंगेश जगन्नाथ गुणाजी यांनी सांगितले की, आम्ही जनसुनावणीमध्ये आत मंडपात येत असताना आमची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी घेतली. आम्ही येथे प्रकल्पास विरोध करण्यासाठी आलो आहे, मंजूरीसाठी नाही. सही घेण्याच्या वहीवर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा पत्ता होता व त्यात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची मे. व्हेरिटास कंपनीच्या मंजुरीसाठी सही मोहिम असे लिहिलेले होते. ते त्वरित थांबवावे. येथे आम्ही प्रकल्प विरोधासाठी आलेलो आहेत, तर मंजूरीसाठी सही कशी घेता ?

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की ती स्वाक्षरी ही आपण बैठकीत आपल्या सूचना, आक्षेप, विचार नोंदविण्यासाठी आल्याचा पुराव्यासाठी आहे. पर्यावरण समिती व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आपल्या भावना केंद्र शासनाकडे पाठविण्यासाठी ही सुनावणी आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की किती लोक उपस्थित होते ? ते शासनास कळविण्यासाठी सही घेण्यात येत आहे. ती तुमची उपस्थिती आहे. ही समिती कुठली ही मंजूरी देत नाही. बैठकीचे इतिवृत्त स्थानिक भाषेत व इंग्रजीत तयार करण्यात येते. त्यांची प्रत जनतेस उपलब्ध करुन देण्यात येते.

श्री.गुणाजी यांनी प्रश्न विचारला की, सदरहू कंपनी ही नानवली गावात उभी राहणार आहे. करलास गाव, ग.नं.१८ हे ठिकाण प्रकल्पासून ६ कि.मी. लांब आहे. कोरोनाच्या काळात प्रकल्प स्थानाशिवाय येथे सुनावणी घेणे योग्य आहे काय?

सदस्य, पर्यावरण जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कोव्हीडच्या पार्श्वभूमीवर पंचक्रोशीचा विचार करुन करलास गाव हे निश्चित करण्यात आलेले आहे. जनतेचा विचार करुन ही जागा निवडली. जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग किंवा इतर जागेचा विचार आपल्या सर्वांच्या सोयीसाठी केलेला नाही. आपला विचार करुन ही बैठक बोलावली आहे. त्याचप्रमाणे ऑनलाईन जनसुनावणी बैठक चालू आहे. त्यामुळे सर्वांना ती दिसून त्यांना आपल्या सूचना मांडण्यात याव्यात.

श्री.गुणाजी यांनी आक्षेप नोंदविला की नानवली गावाच्या काही भागात हा प्रकल्प ऊभा राहणार आहे. नानवली गाव हे पुर्णपणे हरित पट्टा (ग्रीन झोन) मध्ये येते. तरी नानवली गावात प्रकल्प कसा उभा राहू शकतो. ही उत्पादन करणारी कंपनी हरित पट्ट्यात कशी उभारू शकते.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की, व्हेरिटास कंपनीची जागा ही भराव केलेली जागा (Reclaimed Land) आहे. ती हरित पट्ट्यामध्ये नाही. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या परवानगीने मे.बालाजी इन्फ्रास्ट्रकचर (दिघी पोर्ट लि.) यांनी भराव टाकला. ती जमीन मे.व्हेरीटास कंपनीने मे.बालाजी इन्फ्रास्ट्रकचर (दिघी पोर्ट लि.) कडून भाडेपट्टीने घेतलेली आहे. ७/१२ जो आहे तो गट नं. मे. बालाजी ईन्फ्रा प्रोजेक्ट लि. (दिघी पोर्ट लि.) च्या नावाने आहे. हया भाडेपट्टयाच्या जमीनीचे कागदपत्र नोंदणी दुय्यम निबंधक कार्यालयात करण्यात आलेली आहे व ही कागदपत्रे कोणत्याही शासकीय कार्यालयात दाखल करण्यास आम्ही तयार आहोत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात कुठलेही तेल, कोळसा वा स्लज ऑईल वापरण्यात येणार नसून नैसर्गिक वायू वापरण्यात येणार आहे.

श्री.गुणाजी पुढे म्हणाले की, या आधी दिघी पोर्ट मध्ये उत्खनन, डोंगरफोड व समुद्रामध्ये भराव टाकून आमचे जीवन नरकमय केले. तसेच भरावामुळे मासेमारी व मत्स्यव्यवसायावर मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहेत. आम्हांला हा प्रकल्प नको हे आम्ही पंचक्रोशीतर्फे जाहिर करत आहे.

**६. श्री.हरिश पांडुरंग चिकाटी, राहणार दिघी, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

श्री.हरिश पांडुरंग चिकाटी यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की, येथे प्रश्न कसले विचारता ? स्थानिकांचा प्रकल्प नको आहे. तर प्रश्न विचारण्यास कशाला सांगता. आम्हाला कंपनी नको तर प्रश्नांची व उत्तराची गरजच नाही. येथे लोक उन्हामध्ये उभे आहोत तरी कंपनी त्या लोकांसाठी काय करू शकत नाही तर नंतर काय करणार ? त्यांनी अध्यक्षांना आपण इथे कशासाठी आलेल्या आहात, आम्ही बोलविले नाही, तुम्ही इथून निघून जा असे सांगितले.

त्यावेळी अध्यक्षा यांनी जनसुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासनाची प्रतिनिधी म्हणून आलेली आहे असे सांगितले. तुमचे म्हणने ऐकण्यासाठी ही जनसुनावणी आहे.

त्यावेळी, सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत प्रदर्शित केले की जनतेचे मत शासनास कळविण्या साठीच सदरहू जनसुनावणी आहे. मा.अध्यक्षा या आपल्यासाठी येथे आलेल्या आहेत, त्या इथे कंपनीसाठी नाही बसल्या, आपण जो विरोध करत आहात, तो ही आम्ही शासनास कळविणार आहोत. त्यासाठी अध्यक्षा आलेल्या आहेत. असे कधीही म्हणण्यात येऊ नये. शासन हे जनते साठी आहे, कंपनीसाठी नाही.

**७. श्री.दामोदर पाटील, करलास, सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत दिघी, ता.श्रीवर्धन, जि.रायगड व शिवसेना विभाग प्रमुख:-**

श्री.दामोदर पाटील यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की, सदरहू प्रकल्प उभारणीसाठी लागणारे साहित्य दिघी बंदरावर उतरलेले आहे काय ? स्थानिक जनता दिघी बंदर प्रकल्पाचे दुष्परिणाम भोगत आहे. दिघी पोर्टची जी जनसुनावणी झाली त्यामध्येही आम्हाला आश्वासने दिली गेली पण पुढे काही झालेले नाही. रस्ते, पाणी, प्राथमिक आरोग्य केंद्र, रोजगार यांसाठी त्यांनी काहीही केलेले नाही. आमचा सर्व दिघी ग्रामपंचायतीचा प्रकल्प संपूर्ण विरोध आहे. सर्व सादरीकरण हे दिशाभूल करणारे आहे. समुद्र ही कोळ्यांची आई आहे. मच्छिमार हा येथील लोकांचा व्यवसाय आहे. या पंचक्रोशीचा समाज कोळी बांधवांमुळे आहे. त्यावेळी दिघी गाव नव्हते. मी काही प्रश्न विचारत आहे ,

अ) ही कंपनी आधी कुठे होती व इकडे का आली?

ब) महाराष्ट्र मेरीटाईन बोर्डने जागा ग्रामपंचायतीच्या परवानगी शिवाय मे.व्हेरिटासला दिली ? त्याचा खुलासा करण्यात यावा.

क) कोणी यास ना हरकत प्रमाणपत्र दिले. ग्रामपंचायतीस काही महत्व आहे की नाही.

ख) महाराष्ट्र मेरीटाईन बोर्डने सरकारी भाडेपट्ट्याने देण्यात आलेले भूखंड, परस्पर मे.व्हेरिटासला कसे देऊ शकते ? या व्यवहारास आम्ही ग्रुप ग्रामपंचायतीने विरोध केलेला असून, मा.मुख्यमंत्र्यांना ते कळविण्यात आलेले आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की जगप्रसिध्द कंपनी मे.इनिऑस कंपनीने हे तंत्रज्ञान दिलेले आहे. त्यांची ती मशिनरी आहे. त्यांचा एक प्रकल्प मलेशियात उभारला आहे. ती अतिरिक्त मशिनरी त्यांनी आणून दिघी पोर्टच्या जागी ठेवलेली आहे. त्याचे पॅकिंग उघडलेले नाही.

श्री.दामोदर पाटील यांनी आक्षेप नोंदवला की, याचा अर्थ २०१६ ला महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळा ची, शासनाची फसवणूक करुन कंपनीने परवानगी घेतलेली आहे. त्यासाठी आत्मदहन करण्याची वेळ आली तरी चालेल, आम्ही सर्व ग्रामस्थ मंत्रालयात, मुख्यमंत्र्यांच्या समोर उपोषणास बसणार आहोत, आमचा जीव गेला तरी चालेल. तरी आमचा प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

**८. श्रीम.गीता भद्रशेन वाढई, उप सरपंच, दिघी ग्रामपंचायत, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

श्रीम.गीता भद्रशेन वाढई यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की, आम्ही सर्व ग्रुप ग्रामपंचायतींनी प्रकल्पास विरोध दर्शविला असून तो जाहिर केलेला आहे. मे.व्हेरीटास कंपनी यांची आमच्याकडे चार ते पाच वेळा पत्रे आलेली आहेत व ग्रामपंचायतीने त्यांना वारंवार उत्तरे दिलेली आहेत. तरी सर्व ग्रुप ग्रामपंचायती तर्फे महिला ग्रामस्थांतर्फे मी जाहिर विरोध करत आहे. ही जनसुनावणी ही रद्द करण्यात यावी. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविताना माहिती दिली की गट क्र. ३९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५६, ५७, ६१, ६३, ६६ हे गट क्रमांक नानवली गावाच्या हद्दीत असून सदहू भूखंड हे पहाडी विभागात (Hill Area) आहे. मग अहवालात ते प्लॅटफॉर्म विभागात (platform area) कसे दाखविले ? सदरहू प्रकल्प प्रवर्तक हे या गट क्रमांकाचे मालक वा प्रोप्रायटर नाहीत. तर हे येथे कंपनी कशी उभारू शकतात. हे लेखी निवेदन सादर केलेले आहे. दुसरा आक्षेप असा आहे की सदरहू भूखंड हे जैवविविधतेसाठी (Bio-diversity) राखीव आहेत. तो आम्हांला कोणालाच देता येत नाही. कारण तेथे विविध जैवविविधता आहे. मोठमोठे वृक्ष आहेत ते तोडता येणार नाहीत.त्याचप्रमाणे ७५/अ भूखंडावर गुरचरण जागा/गायरान आहे. ही जमीन दिघी पोर्टने फोडलेली आहे. म्हणजेच गट विभागणी झालेली आहे. ही जागा अस्तित्वात नाही. दिघी बंदर व्यवस्थापन ती बेकायदेशीरपणे नष्ट केलेली आहे. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या पत्रानुसार येथे ब्लास्टींगला परवानगी नाही. तेथे बेकायदेशीर उत्खनन करण्यात आलेले आहे. गुरचरण जागा ही ग्रामस्थांची आहे. गुरांना राखीव भूखंड ठेवत आहे.तिसरा विषय म्हणजे भराव टाकणे (Reclamation) हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. मे.दिघी पोर्टने त्या ठिकाणी बेकायदेशीर भराव टाकलेला आहे. पुर्वी तेथे समुद्रकिनारा होता. पर्यावरण संमती पत्रातील तरतुदींनुसार पूर्वी पर्यावरण संमती देताना वाळू किना-यावर भराव टाकण्यास परवानगी नसताना १०० कि.मी. भराव टाकण्यात आलेला आहे. आपण कृपया लिहून घ्या की, भराव टाकलेली जागा ही तो नानवली ग्रामपंचायतीची आहे. भराव जमिन (Reclamation Land) समोर समुद्र आहे. ती ग्रामपंचायतीची जागा कोणालाच देता येत नाही. सर्व कागदपत्रे सादर करत आहे. The Project Proponent is not all owner of the reclaimed plot. The Grampanchayat is owner of the plot. त्यामुळे त्यांना जनसुनावणी शासनाने घेण्यास सांगण्याचा अधिकार नाही. दिघी बंदराचा विकास करताना दवाखाना, शाळा देण्याचे अभिवचन देण्यात आले. काहीही विकास झालेला नाही. रस्ते नाही. गावातील बाई बाळंतपणासाठी जाताना रस्त्यातच मरते. येथे आठ कंपन्या आहेत. माझ्या गावाला पाणी प्यायला नाही. या प्रकल्पात निश्चितच प्रदूषण होणार आहे. भराव जागेसमोर समुद्र आहे.पारंपारिक मासेमारी व्यवसाय हा कायमचा बंद होईल. त्यांचे उदरनिर्वाह केवळ त्या मासेमारीवरच आहे. आम्ही या प्रकल्पास पुर्ण विरोध करत असून याबाबत हरित

न्यायालयात दावा दाखल आहे. गुरचरण व भराव टाकलेली जागा यांची शासकीय हरीत लवादाकडे न्यायालयात सदर प्रकरण आहे. ही पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

**९. श्री.नरेश रामचंद्र कांबळे, राहणार नानवली गाव, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

श्री.नरेश रामचंद्र कांबळे यांनी सांगितले की, आपण झाडे लावा व पर्यावरण जगवा असे म्हणतो. येथे प्रदूषण होत आहे. दिघी बंदर प्रकल्प मोठा, पण गावातील फक्त चार मुलेच तेथे कामाला आहेत. सदरहू प्रकल्पास आमचा विरोध आहे.

**१०. श्री.इक्बाल जलाली, गाव दिघी, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

श्री.इक्बाल जलाली यांनी सांगितले की, भारतामध्ये गांधीनगर, जे.एन.पी.टी, ओरीसा, गुजरात अशी अनेक बंदरे आहेत. तर दिघी बंदर प्रकल्प प्रवर्तकांनी कसे निवडले. याचे उत्तर देण्यात यावे. या प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे लोक, दिघी बंदर येथील लोक मरतील. दिलेला अहवाल लोकांना एक महिना अगोदर उपलब्ध करण्यात यायला हवा होता. तुम्ही आज अहवाल सादर करता. तुमच्यावर विश्वास नाही माझा. आमचा प्रकल्पास विरोध आहे.

**११. श्री.दिनेश नागती, राहणार नानवली, ता. श्रीवर्धन, जि.रायगड -**

मी नानवली गावचा रहिवाशी आहे आणि आमची अशी हाकलपट्टी होत असेल तर आमचा स्थानिक असून काय उपयोग आणि तुम्ही आम्हाला बाहेर काढताय. स्थानिकांना विश्वासात न घेता प्रकल्प प्रवर्तकांनी अहवाल तयार केलेला आहे. तरी हे आंदोलन कायमस्वरुपी करण्यात येणार आहे. आमचा जीव गेला तरी चालेल. जर कंपनी आली, तर आमचा गाव उतरेल, जीवित हानी झाली तर ती आपली शासन जबाबदारी असेल.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले कि, नानवली गावचे बरेच लोक बोलले आहेत. त्याची लेखी स्वरूपात नोंद आमच्याकडे आहे. प्रत्येकाला संधी दिलेली आहे. आम्ही तुमचे प्रश्न पुर्णपणे ऐकून घेत आहोत. बाकीचे लोक उन्हामध्ये बाहेर उभे आहेत. जे आपल्याला बोलायचे आहे ते थोडक्यात बोला. कृपया आपण लेखी स्वरूपात निवेदन द्यावे.

**१२. श्री प्रमोद गोरीवले, राहणार मणेरी नानवली गाव, ता. श्रीवर्धन, जि.रायगड -**

आमचे गाव मे. व्हेरिटास प्रकल्पाच्या लगतच डोंगरावर आहे. शेती हा मुख्य व्यवसाय आहे. प्रकल्प प्रवर्तक प्रकल्पात चिमणी (धुरांडे) बसविणार असून त्याची उंची किती आहे ? त्याचा आम्हाला काही त्रास होईल का ? दुसरा प्रश्न पर्यावरणाची काळजी प्रकल्प प्रवर्तक घेतील याची हमी आहे का ? त्यांनी येथे दिलेले आश्वासन पाळतील याची शाश्वती काय ? जे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने पत्र दिले, त्यावर मोहोर नाही. तर आम्ही कसे समजायचे कि, ते महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की गावाची उंची ही समुद्र सपाटीपासून १२५-१५० मी. आहे. चिमणी ५० मी. उंचीची राहिल व फक्त नैसर्गिक वायुच वापरात येणार आहे. कुठलेही डिझेल, स्लज ऑईल, कोळसा वापरात येणार नाही.

श्री.गोरीवले यांनी आक्षेप नोंदविला की नैसर्गिक वायूला वास असतोच. आम्हांला मारायला आलेला आहात काय ? आमचा निषेध नोंदवितो. आम्हांला कंपनी नको आहे.

प्रकल्प सल्लागार यांच्या सांगण्यावरून असे निदर्शनास आले की, प्रकल्पामध्ये नैसर्गिक वायुचा वापर हा विज निर्मितीसाठी होणार आहे आणि बॉयलरमध्ये कोळशाचा वापर नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचे वायु प्रदुषण होणार नाही.

प्रकल्प प्रवर्तकांनी उपस्थितांचे **चौथ्या सत्रासाठी** उपस्थितांचे स्वागत करुन सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची व पर्यावरण व्यवस्थापन योजनांची माहिती दिली. उपस्थितांना प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, हरकती नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

**चौथ्या सत्रास उपस्थित १०० व्यक्तीपैंकी खालील व्यक्तींनी त्यांचे प्रश्न, सूचना, आक्षेप उपस्थित नमूद केले.**

**१. श्री.गोविंद गुनाजी, राहणार दिघी, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्री.गोविंद गुनाजी यांनी नमूद केले की, सदरहू जनसुनावणी साठी लोक ३ कि.मी. अंतरावर चालत आले. सर्व कोळी बांधवांचा या प्रकल्पास विरोध आहे. सकाळपासून लोक उन्हामध्ये उभे आहेत, येथे काहीही व्यवस्था नाही. आमचा या कंपनीस तीव्र विरोध आहेत.

**२. श्री.शशीकांत बेडेकर, दिघी कोळीवाडा, दिघी गाव, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्री.शशीकांत बेडेकर यांनी नमूद केले की, स्थानिकांचा विरोध असताना या जनसुनावणीचे आयोजनाचे प्रयोजन काय ? स्थानिकांचा सदरहू प्रकल्पास पूर्ण विरोध आहे.

अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, कंपनीविषयी माहिती देणे हे प्रकल्प धारकांचे काम आहे व जनसुनावणी पध्दतीने ते काम करत आहेत. शेवटपर्यंत सर्वांना ऐकून घेणे हे आमचे काम आहे. तुमचा विरोध सुध्दा ऐकून घेण्याचे आमचे काम आहे व नोंदवून घेणे आहे. हीच शिस्तबध्द कार्यपध्दतीने ही जनसुनावणी आहे.

**३. सौ.श्रध्दा गोरीवले, राहणार नानवली, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

सौ.श्रध्दा गोरीवले यांनी सांगितले की जमिनीत गॅसचा स्फोट होणार नाही हे कंपनीने प्रतिपादन केले ते पूर्णपणे खोटे आहे. डोंबिवली एमआयडीसीत विविध कंपन्या सोडत असलेल्या रासायनिक सांडपाणी व टाकून दिलेले स्फोटके केमीकलस् याचा काही वर्षांपूर्वी झालेला स्फोटमी स्वतः अनुभवलेला आहे. माझा नातेवाईक, भाऊ जवळील मैदानात खेळत असताना टाकून दिलेल्या केमीकल पावडरमुळे पायाला भाजले, मात्र त्याची कोणीही कंपनीने जबाबदारी घेतली नाही. एकदा डोंबिवलीमध्ये केमीकल कंपनीत स्फोट झाल्या मुळे १०० माणसे मेली होती. जर आपण घरातच सुरक्षित नाही, तर कंपनी सहकार्याची अपेक्षा कशी करत आहात.

**४. श्री.गोविंद मेंदाडकर, राहणार दिघी गाव, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड-**

श्री.गोविंद मेंदाडकर यांनी सांगितले की, आपल्या परिपत्रकात असे सांगितले की, कंपनी १३ कि.मी दूर गावापासून पाहिजे पण प्रत्यक्षात तसे नाही. प्रशासन त्याकडे दुर्लक्ष करत आहे व कंपनीस खतपाणी घालत आहेत. आणि आमचा या कंपनीला तीव्र विरोध आहे.

**५. श्री.रामचंद्र धर्मा भालदार, राहणार दिघी गाव, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्री.रामचंद्र धर्मा भालदार यांनी सांगितले की, सर्व कंपन्यांनी सुरवातीस बरीच आश्वासने दिली. मुलभूत सुविधासुध्दा मे.दिघी पोर्ट देऊ शकले नाही. पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. वैद्यकीय अधिकारी व औषधोपचार सुविधा नाही. मी मे.दिघी पोर्टला अशा प्रकारे लेखी पत्रव्यवहार केलेला आहे. जे दिघी पोर्ट देवू शकत नाही ते तुम्ही काय देणार. जोपर्यत तुम्ही नवीन सुविधा देत नाही तोपर्यत येथे कोणतीही कंपनी आणू नका. २५ एप्रिल

२००५ ला दिघी बंदर कार्यान्वित झाले. अजूनही काहीही सुविधा नाही. संबंधित प्रकल्प प्रवर्तक काहीही करणार नाहीत. माझ्यासारख्या माणसाला रोजगार नाही तर दुसऱ्यांना काय रोजगार देणार या कंपनीस आमचा विरोध आहे.

**६. श्री.परशुराम कानभोरे गोरीवले, राहणार नानवली, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्री.परशुराम कानभोरे गोरीवले यांनी सांगितले की, सदर कंपनीचे सर्व पत्रव्यवहार जनसुनावणी संदर्भात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने केलेले आहेत. मे.व्हेरीटास कंपनी ही आमच्या गावाच्या पायथ्याशी येणार आहे. मे.व्हेरीटास कंपनीने आमच्या गावाशी, कोणाशीही पत्रव्यवहार केलेला नाही. सर्व रोजगार गेला आहे.पुर्वी आलेल्या मे.दिघी पोर्टमुळे मच्छिमारी गेली. यास शासनच जबाबदार आहे. प्रकल्पास आमचाविरोध आहे.

**७. श्री.कमळाकर भंगोजी, राहणार दिघी, तालुका श्रीवर्धन, जि.रायगड -**

श्री.कमळाकर भंगोजी यांनी नमूद केले की, करोनाचे संकट असताना घाईघाईने जनसुनावणी घेणे हे चुकीचे आहे. जनसुनावणी ही जनतेसाठी असते. जनतेने जनसुनावणी घ्या असे सांगितलेले नव्हते. सदरहू प्रकल्प पर्यावरण उधवस्त करेल. स्थानिकांचा प्रकल्पास विरोध आहे. अन्यथा आम्ही विष पिऊन प्राण देणार आहोत.

प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले की, मासेमारी हा दिघी आणि आसपासच्या गावातील पारंपारीक व्यवसाय आहे. पर्यावरण मुल्यांकन अभ्यास असे दर्शवितो की, रासायनिक प्रक्रियेतील पाणी हे समुद्रात सोडत नाही. समुद्रात परत सोडणारे पाणी हे फक्त मीठ आणि क्षारयुक्त असेल जे डीफ्युर्जस पाईपने आत समुद्रात सोडण्यात येईल त्यामुळे मासेमारीला धोका निर्माण होणार नाही.

प्रकल्प प्रवर्तकांनी उपस्थितांचे **पाचव्या सत्रासाठी** उपस्थितांचे स्वागत करुन सादरीकरणाद्वारे प्रकल्पाची व पर्यावरण व्यवस्थापन योजनांची माहिती दिली. उपस्थितांना प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप, हरकती नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले.

**पाचव्या सत्रास उपस्थित १०० व्यक्तीपैंकी खालील व्यक्तींनी त्यांचे प्रश्न, सूचना, आक्षेप उपस्थित नमूद केले.**

**१. श्रीम.मीना बालाजी खोपटकर, राहणार दिघी गाव, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्रीम.मीना बालाजी खोपटकर यांनी सांगितले की, आमच्या कोळी लोकांना मच्छी भेटत नाही. आमच्या बोटी बीना मच्छिच्या येतात. आम्ही काय खाणार. आम्ही दर्यावर अवलंबून आहोत. दर्या आमचा देव आहे. त्यामुळे आम्हांला कंपनी नको.

**२. श्रीम.उल्का बाळकृष्ण हांडे, राहणार नानवली, ता.श्रीवर्धन, जि. रायगड -**

श्रीम.उल्का बाळकृष्ण हांडे यांनी सांगितले की, कंपनीमध्ये उत्पादन प्रक्रियेमध्ये स्फोट करतात म्हणून गावात कंप बसतात. तुम्ही आम्हाला विषाची परिक्षा का घ्यायला लावताय ? प्रकल्पास आमचा विरोध आहे.

**३. श्रीम.सुप्रिया जनार्दन गोवारि, रा.दिघी, उपसभापती, पंचायत समिती श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

सौ.सुप्रिया जनार्दन गोवारी यांनी सांगितले की, आम्ही समुद्रामुळेच व मासेमारीमुळे आज इतक्या वरच्या पदावर पोहचलो. करोना वातावरणात जनसुनावणी घेण्याची आवश्यकता नव्हती. आमचा प्रकल्पास विरोध आहे.

**४. श्री.कृष्णा गोविंद, राहणार दिघी कोळीवाडा, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्री.कृष्णा गोविंद यांनी सांगितले की, मे.व्हेरीटास कंपनीने आणलेली उपकरणे ही जूनी आहेत. त्यांनी ही बाहेरून आणलेली आहेत. ती गेल्या तीन वर्षांपासून दिघी पोर्ट बंदरात ठेवण्यात आलेली आहेत. कंपनी आमच्याशी खोट बोलते ही उपकरणे नवीन आहेत. कोळीबांधवांचा प्रकल्पास विरोध आहे. ब्लास्टींग झाले की गावात हादरे बसतात. गावाचे नुकसान होणार आहे.

**५. सौ.अभिलाषा कांडेकर, राहणार दिघी, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

सौ.अभिलाषा कांडेकर यांनी सांगितले की, सकाळपासून सर्व स्थानिक निषेध व प्रकल्पास विरोध करत असताना नविन बॅच बोलविण्याची गरज नाही.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आम्ही येथे सर्वांना ऐकण्यासाठी बसलेलो आहोत. तुम्ही आलात, तुम्ही तुमचे म्हणणे मांडलेत आम्ही ते नोंदवून घेतले आहे. तसेच हे प्रश्न आम्ही शेवटच्या माणसापर्यंत ऐकून घेणार.

**६. श्रीम.मंगल पांडुरंग भोपी, राहणार नानवली, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

श्रीम.मंगल पांडुरंग भोपी यांनी सांगितले की, सदरहू प्रकल्पाचा पशू-पक्ष्यांवर परिणाम होईल. त्यामुळे तुम्ही आलात त्या पावली परत जावे ही अपेक्षा.

**७. श्री.शशिकांत गोविंद नाकती, राहणार मणेरी गाव, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

श्री.शशिकांत गोविंद नाकती यांनी आक्षेप नोंदविला की, या प्रकल्पातून प्रदूषण होणार आहे, म्हणूनच जनसुनावणी बोलावली आहे. सागरास व पर्यावरणास या प्रकल्पाचा धोका आहे. तरी स्थानिक जनता म्हणणारा आहे - गो बॅक व्हेरिटास.

**८. श्रीम.हेमा अनंता पाटील, राहणार दिघी गाव, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्रीम.हेमा अनंता पाटील यांनी सांगितले की, या पूर्वीच्या सर्व कंपन्यांनी वीज, पाणी देवू अशी फक्त आश्वासने दिली. शीतगृह (कोल्ड स्टोअरेज) देऊ, मूलभूत सुविधा देऊ, काहीही दिलेले नाही. सदर प्रकल्पास आमचा विरोध आहे.

**९. श्री.महादेव गोविंद कावळे, राहणार दिघी, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्री.महादेव गोविंद कावळे यांनी सांगितले की, मे.दिघी पोर्ट यांनी सुविधा देण्याचे आमिष दाखविले. शंभर पाण्याचे टँकर देऊ. काहीही दिले नाही. पाणी घेण्यास स्वतः जावे लागते. पाऊस आला की पाणी आणण्यास जाता येत नाही. रस्ते पूर्ण खराब आहेत. जेवणात कचरा येतो. दिघी कोळीवाड्यात डॉक्टर नाही. त्यामुळे आमचा या कंपनीस पुर्णपणे विरोध आहे.

**१०. श्री.यशवंत गोविंद दिघीकर, राहणार दिघी,तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्री.यशवंत गोविंद दिघीकर यांनी सांगितले की, यापुर्वी दिघी पोर्ट ही कंपनी आली आणि बंदरामुळे समुद्रातील पाणी दुषित होत आहे. कोळीबांधवांना मिळणारी मासे बंद झाले. प्रदुषणामुळे बोंबिल यांचा आकार बदलत आहे, चवही बदलत आहे. तरी आमचा प्रकल्पास विरोध आहे.

**११. श्री.चंद्रमणी रामदास मोरे, राहणार दिघी, ता.श्रीवर्धन, जि.रायगड -**

श्री.चंद्रमणी रामदास मोरे यांनी सांगितले की, दिघी पोर्टमध्ये अनेक कंपन्या आला व त्यांची जनसुनावणी झाली नाही. जनतेच्या मागण्या आहेत त्यासाठी आपण साक्षीदार व्हावे. अजुनही आम्हाला पाण्यासाठी कार्टात जावे लागते. म्हणूनच माझे असे म्हणणे आहे की, आपल्या प्रत्यक्ष करार कंपनीबरोबर करण्यात यावा.

**१२. श्री.जगदीश चंद्रकांत भंगोशी, राहणार दिघी कोळीवाडा, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगडः-**

श्री.जगदीश चंद्रकांत भंगोशी यांनी नमूद केले की, लोकजीवनातला मत्स्यव्यवसायावर संबंधित प्रकल्पाचा परिणाम होणार आहे. त्यामुळे जनसुनावणी चालू ठेवण्याचा निषेध करुन प्रकल्पास विरोध करत आहे. ही जनसुनावणी का चालू ठेवायची.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, जनसुनावणी चालू ठेवणे यासाठी आवश्यक आहे की, लोकांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे आणि ते शासनाला पुढे पाठविणे आवश्यक आहे. तरी तुम्ही तुमचे लेखी स्वरूपातील म्हणणे येथे द्यावे.

**१३. श्री.लक्ष्मण खांबेकर, राहणार दिघी कोळीवाडा, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड :-**

श्री.लक्ष्मण खांबेकर यांनी नमूद केले की, जर कंपनीने प्रदूषण केले, तर मच्छिमारीवर परिणाम होईल म्हणून आपण सदरहू प्रकल्प इतरत्र हालवावा.

**१४. श्री.बाळकृष्ण चिकाटी, राहणार दिघी, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड :-**

श्री.बाळकृष्ण चिकाटी यांनी नमूद केले की, दिघी बंदरामुळे बरेच प्रदूषण होत आहे. त्यामुळे बोंबिल, मासे, कोळंबी मिळत नाही.जाळीचे नुकसान होते, त्याची भरपाई देत नाहीत. जर प्रकल्प आला तर आम्ही विरोध करु, प्रसंगी जीविताचा अंत करु.

**१५. श्री.साजीद सईद कर्जीकर,राहणार दिघी, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्री.साजीद सईद कर्जीकर यांनी सांगितले की, आम्ही दिघी गावातील लोकांनी आपल्या समस्या मे. आदित्य एनव्हार्नमेंटल सर्व्हिसेस प्रा.लि. यांना त्यांच्या भेटीत मांडल्या होत्या. त्याचे काहीही झालेले नाही. स्थापन होणारी कंपनी ही उत्पादनात विविध घातक रासायनिक पदार्थ वापरणार आहे. त्यास आमचा विरोध आहे. प्रकल्पास आमचा विरोध आहे.

**१६. श्री.अविनाश गंगाराम रोडे, राहणार नानवली, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड -**

श्री.अविनाश गंगाराम रोडे यांनी सांगितले की, प्रकल्प परिसरातून हटवा. प्रकल्प प्रवर्तक यांच्या माहितीनुसार असे समजते की, गावातील लोकांना सर्व प्रथम रोजगार व नोकरीची संधी उपलब्ध करून दिले जातील. जी लोक प्रकल्पात सामाविष्ठ केले जातील त्यांना विशिष्ठ दर्जाचे प्रशिक्षण दिले जाईल.

बैठकीचा समारोप करताना बैठकीचे सदस्य, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले. त्यांनी चर्चेत उपस्थित केलेल्या सूचनांचा विचार करताना सांगितले की, ही जनसुनावणी पाच भागात झाली. प्रत्येक भागात १०० व्यक्तींना प्रवेश देण्यात आला. कोव्हीडच्या विषाणु प्रादुर्भाव टाळण्यासाठी शासनाने घालून दिलेले सर्व निर्देश पाळून ही जनसुनावणी आयोजित करण्यात आली. स्थानिकांच्या भावना ह्या केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे सादर करण्यात येतील. तेथील तज्ज समिती याबाबत योग्य तो निर्णय घेते. त्यांनी शासकीय अधिकारी, प्रकल्प प्रवर्तक या सर्वांचे आभार मानून मा.अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले. मा.अध्यक्षांचे आभार मानून सुनावणी संस्थगित करण्यात आली.

उपरोक्त प्रकल्पास ईमेल व्दारे, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय व जनसुनावणी स्थानी प्राप्त झालेली सर्व निवेदने एकुण २५३ सोबत जोडलेली आहेत.

**(श्री.सागर औटी)**
समन्वयक,
पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी महाड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड

**(श्री.जगन्नाथ साळुंखे),**
सदस्य,
पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी रायगड
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई.

**(डॉ.पदमश्री बैनाडे)**
अध्यक्षा,
पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड